**औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद**

**मनपा क्षयरोग नियंत्रण समिती,औरंगाबाद**

जा.क्र.मनपा/आरोग्य/१५८८/२०१९ दिनांक :- २९/ ०८/२०१९

## खाजगी वाहन भाडेतत्वावर घेणेबाबतची दरपत्रक सूचना

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मनपा क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबाद करिता इंडीगो / बोलेरो / स्कॉरपिओ / टाटा सुमो इत्यादीपैकी सुस्थितीतील मेक मॉडल एक (०१) वाहन भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे. सदरील वाहन ५ वर्षापेक्षा जुने असू नये. याकरिता नोंदणीकृत वाहनधारक / कंत्राटदार एजन्सीकडुन दोन लिफाफा पध्दतीने दिनांकः- ०६ / ०९/२०१९ पर्यंत दरपत्रक सूचना मागविण्यात येत आहे.

आपले दरपत्रक सदस्य सचिव, मनपा क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबाद या नांवे सादर करावे. दरपत्रक स्वीकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मनपा क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबादने राखून ठेवलेले आहेत.

29/8/19

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी,**<br>
**तथा उपाध्यक्ष**<br>
**मनपा क्षयरोग नियंत्रण समिती,**<br>
**औरंगाबाद.**

23.7.19

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## मनपा क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबाद

जा.क्र.मनपा/आरोग्य/१७५५/२०१९ दिनांक :- २९/०८/२०१९

## दरपत्रक सूचना

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मनपा क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबाद करिता इंडीगो / बोलेरो / स्कॉरपिओ / टाटा सुमो इत्यादीपैकी सुस्थितीतील मेक मॉडल एक (०१) वाहन भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे. सदरील वाहन ५ वर्षापेक्षा जुने असू नये. याकरिता नोंदणीकृत वाहनधारक / कंत्राटदार एजन्सीकडुन दोन लिफाफा पध्दतीने दिनांकः- ०६ / ०९ /२०१९ पर्यंत अल्प मुदतीची दरपत्रक सूचना मागविण्यात येत आहे.

### दरपत्रक भरण्यासाठी कार्यपध्दती :-

तांत्रिक निवीदेमध्ये कुठल्याही प्रकारचे दर नमुद करु नयेत. नसता निवीदा रद्द करण्यात येईल. सर्व प्रथम तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. ज्या निवीदाधारकांचे निविदेतील अटी व शर्ती पुर्ण केलेल्या असतील त्याच निवीदा धारकांचे व्यावसायिक दरपत्रक उघडण्यात येईल.याबाबत महानगरपालिका क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबाद या कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील. निविदा उघडण्याच्या वेळेस निवीदाधारक उपस्थीत राहू शकतील.

### अ) तांत्रिक निविदा :-

१. फर्म/एजन्सीचे /संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
२. पत्ता
३. मोबाईल क्रमांक
४. एजन्सीच्या नावाचे पॅन कार्ड सत्यप्रत
५. वाहन पुरवठा करण्याबाबत अनुभव प्रमाणपत्र
६. पुर्ण निविदा सर्व माहितीसह एजन्सीच्या अधिकृत व्यक्तीने भरुन शिक्का व स्वाक्षरी करावी. (तांत्रिक निवीदेमध्ये दर भरण्यात येऊ नये)
७. वाहनाची कागदपत्रे, विमा प्रमाणपत्र.
८. इ.एम.डी. रु.५०००/- Municipal Corporation TB Control Society, Aurangabad या नांवे राष्ट्रीयकृत बॅंकेचा डीडी फक्त.
९. कंत्राटदार यांना वाहन मालकाकडून नाहरकत प्रमाणपत्र ई-निविदा प्रसिध्द झाल्यानंतर रु.१००/- च्या बॉण्ड पेपरवर द्यावे लागेल.

**ब) व्यावसायीक दरपत्रक :-**

व्यावसायीक दरपत्रक शेडयुल-१ मध्ये दर भरण्यात यावे.

**दरपत्रक प्रक्रीयेने वाहन भाडे तत्वावर घेण्यासाठी खालील अटी व शर्ती:-**

१ वाहन प्रतिमाह २००० कि.मी.चालेल अतिरीक्त कि.मी.चे दरपत्रक स्वतंत्रपणे देण्यात यावे.

२. नियमाप्रमाणे टॅक्सीची आकारणी करुन देयकातून कपात करण्यात येईल.

३. इंधन, वंगण, दुरुस्ती, वाहनाचे वेतन, टोल भाडे इ.ची जबाबदारी पुरवठाधारकाची असेल.

४. वाहन ५ वर्षापेक्षा जुने असू नये.

५. वाहनांची किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे, तसेच सदरहू वाहनाऐवजी पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही पुरवठाधारकाची राहील. याकरिता अतिरिक्त दर दिले जाणार नाही.

६. वाहनाचा कोणत्याही प्रकारचा अपघात झाला तर त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकावर राहील. याकरिता मनपा क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबादकडून कोणत्याही प्रकारचा निधी मीळणार नाही.

७. भाडयाने दिलेले वाहन नादुरुस्त झाल्यास मालकाने पर्यायी वाहन उपलब्ध करुन न दिल्यास या कार्यालयाकडून दुसरे वाहन उपलब्ध करुन घेण्यात येऊन त्याचे भाडे संबधीत नादुरुस्त झालेल्या वाहनाच्या मालकाकडून बाजार भावाच्या दराने जे प्रती दिवस दर देण्यात येईल त्याप्रमाणे तेवढया दिवसाचे भाडे देयकातून कपात करण्यात येईल.

८. वाहनधारकाने प्रत्येक महिन्यात फिरती केलेल्या लॉगबुकची सत्यप्रत सदस्य सचिव तथा शहर क्षयरोग अधिकारी, मनपा क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबाद यांच्या स्वाक्षरीसह अहवाल सादर केल्याशिवाय भाडे अदा करण्यात येणार नाही.

९. शासकीय, निमशासकीय सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या नावावर वाहन असल्यास निविदा प्रक्रीयेमध्ये त्यांच्या वाहनाचा विचार केला जाणार नाही.

१०. वाहन पुरवठाधारकास मनपा क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबाद यांच्याशी करार करणे आवश्यक आहे.

११. वाहनचालकाकडे अधिकृत वाहन परवाना (Valid Motor Licenses) असावा.

१२. वाहनावर सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचा Logo असणे आवश्यक आहे.

१३. वाहन तसेच वाहन चालक वेळेवर उपलब्ध नसणे, वारंवार दुरुस्ती असणे, वाहन चालकाचे गैरवर्तन इत्यादी कारणांसाठी दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१४. दरपत्रकाच्या शर्ती व अटीचे पालन न केल्यास पुर्व सुचना न देता दरपत्रक रद्द करण्यात येईल.

१५. अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मनपा क्षयरोग नियंत्रण समिती, औरंगाबाद यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१६. सदर वाहन केवळ ११ महिन्याकरीता भाडेतत्वावर घेण्यात येत आहे.

१७. वाहन Air Conditioned असणे आवश्यक आहे.

## Schedule-I

## व्यावसायिक निविदा (Commercial Bid)

मी / आम्ही ______________________________

नोंदणीकृत एजंन्सी/संस्था/कंत्राटदार निविदा पुस्तीकेतील नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे अवलोकन केलेले असून त्या सर्व मला / आम्हाला मान्य असून मी / आम्ही एक चारचाकी वाहनाचा पुरवठा करण्यासाठी खालील प्रमाणे दर सादर करत आहे / आहोत.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| 01 | इंडीगो / बोलेरो / स्कॉरपिओ / टाटा सुमो इत्यादीपैकी | वाहन चालक, इंधनासह, टोल चार्ज व भत्तासह रु.________ (अक्षरी रुपये ____________________प्रतिमाह व त्यापुढील प्रति कि.मी.करिता रु.______ (रुपये.____________________) इतके दर सादर करण्यात येते. |

दिनांक :-

ठिकाण :-

स्वाक्षरी व शिक्का
एजंन्सी

आरोग्य वैद्यकीय अधिकारी
तथा उपाध्यक्ष
मनपा क्षयरोग नियंत्रण समिती
औरंगाबाद.